जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 OCT 2017

तरूण भारत

# कुशल प्रशासक : प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापुरातील श्री शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिवाजी विद्यापीठाचे माजी बी. सी. यू. डी. संचालक व प्रभारी कुलगुरू प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा आज रविवारी गौरव समारंभ व गौरव अंक प्रकाशन सोहळा होत आहे. यानिमित्त...**

प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचे मूळ गाव गडहिंग्लज तालुक्यातील कडगाव. मात्र ट्रक व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचे वडिल बेळगाव येथे वास्तव्यास गेले. त्यामुळे त्यांचे बालपण व शिक्षण बेळगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण कस्तुरबा वालचंद कॉलेज, सांगली येथून पूर्ण केले. शिवाजी विद्यापीठातून एम. ए. इंग्रजी पूर्ण केले. महाराष्ट्र, कर्नाटक सीमा प्रश्नाची झळ त्यांनाही बसली.



पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी कोल्हापुरातील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात कनिष्ठ विभागाकडे १९८० मध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीची सुरुवात केली. दसरा चौकात महाविद्यालय आल्यानंतर त्यांची वरिष्ठ महाविद्यालयाकडे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. महाविद्यालयांचे तत्कालीन प्राचार्य (कै.) डॉ. डी. डी. कटांबळे मूळचे बेळगावचे त्यामुळे मोरे यांचा त्यांच्याशी ऋणानुबंध जुळला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोरे यांनी पीएच. डी. पूर्ण केली. १९९६ मध्ये प्राचार्य डॉ. कटांबळे निवृत्त झाल्यानंतर शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष होते. मात्र १९८० पासून श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे तत्कालीन चेअरमन माजी कृषी राज्यमंत्री दिवंगत श्रीपतराव बोंद्रे दादा यांनी मोरे यांची झोकून देऊन काम करण्याची वृत्ती जवळून पाहिली होती. बोंद्रेदादांनी मोरे यांना या पदासाठी अर्ज करावयास सांगितले. त्यानंतर मोरे यांनी विद्यापीठ कायद्याचा अभ्यास करुन यशस्वी मुलाखत दिल्यानंतर त्यांची विद्यापीठ समितीने प्राचार्यपदी निवड केली.

डॉ. मोरे यांची प्राचार्यपदी निवड झाल्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांच्यातील प्रशासक पदाचे गुण दिसू लागले. सर्वप्रथम त्यांनी महाविद्यालय परिसर व्यसनमुक्त केला. ते प्राचार्य संघटनेचे सचिव झाले. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीत योगदान दिले नंतर ते शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी सलग तीनवेळा निवडून आले. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेबरोबरच त्यांनी अनेक समित्यांवर काम केले.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी त्यांची विद्यापीठाचे बी. सी. यू. डी. संचालक म्हणून निवड केली. या पदावर काम करीत असताना त्यांनी सर्व घटकांना न्याय देण्याचे काम केले. कुलगुरू डॉ. शिंदे एक महिना इंग्लडच्या अभ्यास दौऱ्यावर गेल्यानंतर त्यांची राजभवनातून कुलगुरू म्हणून निवड झाली. एका सामान्य कुटुंबातील व्यक्तीने सर्वोच्चपदी विराजमान होण्याची दुर्मिळ संधी लाभली. या पदाची शान ठेऊन विद्यापीठाचा नावलौकीक पाठवण्याचे काम त्यांनी केले. माझ्यासारखे शेकडो विद्यार्थी घडवण्याबरोबरच एक कुशल प्रशासक आणि संघटक म्हणून त्यांनी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात नावलौकीक मिळवला आहे. त्यांचे आयुष्यही शैक्षणिक क्षेत्राला दिशा देणारे ठरो, ही सदिच्छा !

**प्रा. एस. पी. चौगले**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

शिवाजी विद्यापीठाच्या बीसीयूडीचे माजी संचालक आणि श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे माजी प्राचार्य **प्रा. डॉ. डी. आर. मोरे** प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा कार्यगौरव समारंभ आज (रविवार) होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या कारकिर्दीविषयी...

# कुशल प्रशासक आणि प्राचार्य

■ **प्रा. डॉ. पांडुरंग पाटील**

प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे १९८१ पासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. श्री शहाजी छत्रपती महविद्यालयात त्यांनी ज्युनिअर कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून आपल्या कारकीर्दीस सुरूवात केली. त्यानंतर दोन वर्षानंतर त्यांनी वरिष्ठ महविद्यालयाकडे प्राध्यापक म्हणून कामास सुरूवात केली. १९९८ पासून त्यांनी श्री शहाजी छत्रपती महविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कारकीर्दीस सुरूवात केली. माजी कृषी राज्यमंत्री श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांनी मोरे यांचे इंग्रजीतील प्रभुत्व, चांगले अध्यापन आणि प्रशासकीय कौशल्य ओळखून त्यांना स्वत:हून प्राचार्य होण्याची संधी दिली. डॉ. मोरे यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून शहाजी महविद्यालयाचा नावलौकिक वाढविला.

**निमित्त**

त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थी पीएच. डी. व एक विद्यार्थी एमफिल अशा एकूण १३ विद्यार्थ्यांनी संशोधन पूर्ण केले. १९ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक कारकीर्दीत त्यांनी प्राचार्यपदाबरोबर शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक, प्रभारी कुलगुरू म्हणूनही काम केले. तसेच अभ्यास मंडळ, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद, प्राचार्य असोसिएशनमध्ये प्रामणिकपणे केलेल्या कामाचा अनुभव त्यांना यावेळी झाला.



डॉ मोरे यांनी लिहिलेल्या दोन पुस्तकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. अमेरिकेतील ग्रंथालयाने त्यांच्या ग्रंथांना आंतरराष्ट्रीय मानांकन दिलेले आहे. त्यांच्या हाताखालून हजारो विद्यार्थी, प्राध्यापक, आधिकारी, कर्मचारी घडले. त्यांच्या कार्याचा यथोचित गुणगौरव व्हावा या हेतूने विविध क्षेत्रातील मंडळींनी प्राचार्य मोरे गौरव समिती स्थापन करून त्यांचा यथोचित गौरव करण्याचे योजिले आहे. प्रा. डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी संपदित केलेल्या 'प्रेरणा' या गौरव अंकात शैक्षणिक, सामजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात काम केलेल्या ३५ हून आधिक लोकांनी डॉ. मोरे यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला आहे. या गौरव अंकाचे प्रकाशन यावेळी होणार आहे.

प्राचार्य मोरे यांच्या यशस्वी कारकीर्दीचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे त्यांचे वाचनवेड होय. लहानपणापासूनच त्यांनी वाचनाचे वेड जपले आणि समृद्ध केले. चांगली पुस्तके शोधण्याबरोबरच आपले ज्ञान वृद्धींगत करण्याबरोबरच ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे कार्य आजही सुरूच आहे. त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा !

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 OCT 2017
तरुण भारत

# प्राचार्य डॉ. मोरे यांचा आज सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**कोल्हापूर :** शहाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि शिवाजी विद्यापीठाच्या बीसीयुडीचे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त रविवार ८ रोजी दुपारी ४ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. शहाजी महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. श्रीमंत शाहू महाराज अध्यक्षस्थान भूषवविणार आहेत. याप्रसंगी प्रा. डॉ. राजेख़ान शानेदिवाण संपादित 'प्रेरणा' या गौरव अंकाचे प्रकाशन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला डॉ. डी.वाय. पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य एकनाथ काटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 OCT 2017
Times of India

# SUK staff trained on distance edu for upcoming exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The centre of distance education (CDE) of the Shivaji University on Friday conducted a workshop for its staff members on exam-related changes that will be made from this year.

It has to be noted that the SUK will conduct all its future semester examinations, including the on-going October semesters with the help of its own IT cell.

The workshop focused on passing the knowledge about the issuing hall tickets to the students, distribution of exam papers and management of the exam centres.

Mahesh Kakade, director, board of examinations and evaluation, SUK said, "All the entities associated with the examination should make sure that not a single student is missing during the examination due to any kind of negligence."

"We are obliged to work hard and put students' welfare before anything else. Exams are conducted smoothly with the help of proper coordination between the officials and the staff members," he added.

**The workshop focused on passing the knowledge about the issuing hall tickets, distribution of exam papers and management of the exam centres**

In case, if a staff member comes across any kind of technical problem with the examination process, then they should immediately contact the board of examinations and evaluation and resolve their query.

An SUK official said, "As many as 58 coordinators were present for the workshop along with staff members from the CDE."

It has to be noted that apart from the regular study centres in mostly urban areas, the CDE has introduced 13 study centres during this academic year. With the addition of these 13, the total numbers of study centres have gone up to 60.